**महाराष्ट्र शासन**

क्र. जिपब ४८१८/प्र.क्र.१०८/आस्था १४
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक : २४ मे, २०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद ( सर्व )

**विषय : जिल्हा परिषदेच्या गट-क व गट-ड च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत**

सद्य:स्थितीत राज्यात स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ, विधानसभा पोटनिवडणूक, लोकसभा पोटनिवडणूक, इ.निवडणूकांचा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला असून, संबंधित जिल्हयांतील संबंधित मतदारसंघांच्या क्षेत्रांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन कळविण्यात येते की, जिल्हा परिषदेच्या गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदलीबाबत शासन निर्णय दि.१५ मे २०१४ अन्वये विहित करण्यात आलेल्या वेळापत्रकात बदल करण्यात येत असून, चालू वर्षी ज्या जिल्हयांमध्ये निवडणूकीची आचारसंहिता लागू आहे, अशा जिल्हयांमध्ये सदर बदल्या आचारसंहिता संपल्यानंतर, म्हणजेच सर्वसाधारणपणे दि.१५ जून २०१८ पर्यंत करण्यात याव्यात.

( प्रि.शं.कांबळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन